## निशाण क्र. ६८ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरूस्तीस परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र. २ याने दि. ०४/०३/२०१५ रोजी आपली कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांनी प्रतिवादी क्र. २ च्या कैफियतीप्रमाणे आपली कैफियत असल्याची पुरशिस त्याच दिवशी दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. २ याने दिलेल्या कैफियतीमध्ये दावा मिळकती व्यतिरीक्त वादी प्रतिवादींच्या अन्य समाईक मिळकती असल्याचे कोणतेही कथन अथवा तक्रार सदर कैफियतीमध्ये केलेली नाही. प्रतिवादी क्र. २ याने वादीचा पुरावा संपल्यानंतर आपला पुरावा सुरु करणे आवश्यक होते. मात्र आपल्या जबानीचे शपथपत्र न देता प्रतिवादी क्र. २ याने दि. २२/०१/२०२० रोजी नि. क्र. ५० येथे अर्ज देवून सातबारा हजर केले. सदर हजर केलेले सातबारा पाहता ते दावा मिळकती व्यतिरीक्त वादी प्रतिवादींच्या अन्य समाईक खात्याच्या मिळकती आहेत असे दिसून आले. त्यामुळे प्रस्तूत दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज ॲण्ड प्रॉपर्टीज या कायदेशीर तत्वाची हरकत येवू नये म्हणून सदर मिळकती तसेच सदर मिळकतीच्या सातबारावर नमूद केलेल्या इसमांना या कामी पक्षकार करुन तशी प्रस्तूत दाव्यात दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सबब प्रस्तूत दाव्यात कलम १ मधील मिळकतीस अ मिळकत

असे संबोधून अर्जात नमूद ब मिळकती म्हणून सदर मिळकती सामिल करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी असावी. तसेच प्रतिवादी क्र. ४ च्या पुढे अ. क्र. ५ ते ९६ असे जादा प्रतिवादी नमूद करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी असावी. वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रतिवादीने हजर केलेल्या सामाईक खात्याच्या सातबारामुळे उद्भवलेली आहे. सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तरी वादीस सदरची दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. वादीने या कामी सरतपास देऊन दि. २४/०७/२०१९ रोजी त्यांचा उलटतपास घेण्यात आला आहे. त्यानंतर, वादीस योग्य ती संधी देऊन देखील वादीने त्याचा पुढील पुरावा दिलेला नाही. त्यामुळे, त्याच्याविरुध्द पुरावा नाही असा आदेश करण्यात आला आहे. म्हणून, दि.२२/०१/२०२० रोजी प्रतिवादीने त्याच्यावतीने तोंडी पुरावा नाही अशी पुरशिस दिलेली आहे. त्यामुळे दावा हा अंतिम युक्तिवादाकरीता दि. ११/०३/२०१९ पासून नेमण्यात आलेला आहे. वादीने प्रस्तूतचा अर्ज दावा अंतिम युक्तिवादावर नेमला असताना कितीतरी वर्षांनी उशिरा दाखल केलेला आहे. प्रतिवादीने त्याच्या कैफियतीमध्ये दाव्यास आवश्यक पक्षकारांची व मिळकतीची बांधा येत असल्याचे कथन केले आहे. त्यानुसारच, या कामी मुद्दे काढण्यात आलेले आहेत. वादीने त्याकरीता सबळ कारण

दिलेले नाही. वादीने योग्य त्यावेळी प्रस्तूतचा अर्ज दिलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी दाखल केली आहे.

३. वादीला योग्य ती संधी देऊन देखील त्यांनी युक्तिवाद केला नाही. प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी.व्ही.बोडस यांचा मौखिक युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी यांना आपल्या कथनांमध्ये दुरुस्ती करता येते. सदरची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचेमधील वादप्रश्न कायमस्वरुपी संपुष्ठात येण्याकरिता आवश्यक असावी. परंतू, न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेऊनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही. वादीने प्रस्तूतचा दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. त्याने त्यांच्या दाव्यात वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये सहहिस्सेदार असल्याचे सांगितले आहे. याउलट प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये वादी हा दावा मिळकतीमधील त्रयस्थ खरेदीदार आहे, त्यांच्या वडिलांनी खोटया मुखत्यारपत्राचे आधारे मिळकतीचे खोटे खरेदीपत्र करुन घेतले होते, वादीस तथाकथित खरेदी देणारा इसम जर खरोखरच प्रतिवादीचे हिस्सेदार असतील

तर अशा परिस्थीतीत प्रतिवादीच्या सर्व वडिलोपार्जित मिळकती सामील केल्याखेरीज तसेच सर्व पक्षकारांना समाविष्ठ केल्याखेरीज प्रस्तूत दावा चालवू शकत नाही अशी हरकत घेतली आहे. प्रस्तूत कामी तोंडी पुरावा होऊन दावा अंतिम युक्तिवादावर नेमण्यात आला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ खरेदीदार असेल, तर वादीला केवळ खरेदी दावा मिळकती बाबत प्रस्तूतचा वाटपाचा दावा दाखल करता येणार नाही अशी कायदयाने नेमून दिलेली तरतूद आहे. जर खरेदी देणारा इसम प्रतिवादीचे हिस्सेदार असतील तर वादीला दावा मिळकतीमध्ये विशिष्ठ भाग वाटपाने मागण्याचा अधिकार नसतो. त्याकरीता, वादीस प्रतिवादीच्या सर्व मिळकती व सर्व सहहिस्सेदारांना या कामी समाविष्ठ करणे गरजेचे आहे. प्रतिवादीने दि. २२/०१/२०२० रोजी सातबारा हजर केल्यानंतर वादीस आवश्यक ते पक्षकार व मिळकती याबाबतची माहिती मिळाल्याचे प्रस्तुत अर्जात सांगितले आहे. सदरचे कारण हे सबळ दिसते. त्यामुळे, वादी मागत असलेली दुरुस्ती नामंजूर झालेस वादीचे नुकसान होणार आहे. परंतू, वादीने प्रस्तूतचा अर्ज उशिरा दाखल केलेला आहे. प्रस्तूत दावा हा पाच वर्षे पेक्षा जास्त जुना असून प्रतिवादीने दि. ०४/०३/२०१५ रोजी कैफियत देऊन दाव्यास आवश्यक ते पक्षकार व मिळकतींची बाधा येत असल्याचे कथन केले आहे. त्यानुसारच दि. ०२/०४/२०१६ रोजी प्रस्तूत कामी मुद्दे काढयात येऊन प्रस्तूत दाव्यास आवश्यक ते पक्षकार व मिळकतींची बाधा येते का ? असा मुद्दा काढण्यात आला आहे. त्यानंतर, वादीचा तोंडी पुरावा देखील बंद करण्यात आला

आहे आणि दावा आजरोजीपर्यंत अंतिम युक्तिवादावर नेमण्यात आला आहे. त्यामुळे, वादी हे प्रतिवादींना झालेला विलंबाबाबत खर्च देणेस पात्र आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## <u>आदेश</u>

१. वादीचा नि. क्र. ६८ वरील अर्ज रक्कम रु. ४,०००/– च्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. सदरचा खर्च वादी यांनी प्रतिवादी यांना देणेचा आहे.

३. आजपासून १४ दिवसांचे आत खर्चाची रक्कम दिल्यावरच दाव्यात नियोजित दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करणेची आहे.

४. वादीने दावा लवकरात लवकर चालवणेचा आहे.

सही/–
( बी. आर. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ: देवगड
दिनांकः २४/११/२०२१